# सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)
## सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## महाराष्ट्र शासन व गोवा शासन प्राधिकृत व यु.जी.सी., नवी दिल्ली मान्यताप्राप्त
## नोडल एजन्सी आयोजित

सेट विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित करीत असलेली तेहतीसावी (३३ सावी) सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) रविवार, दि. १६ एप्रिल, २०१७ रोजी आयोजित करण्यात येत आहे. सदरहू परीक्षा मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व पणजी (गोवा) या केंद्रांवर घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (http://setexam.unipune.ac.in) उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच भरावयाचा आहे. संकेतस्थळावर अर्ज दि. २७ डिसेंबर, २०१६ सकाळी ११.०० वाजल्यापासून दि. १० जानेवारी, २०१७ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असेल.

विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील संपूर्ण अर्ज संगणकावर ऑनलाईन पध्दतीने भरावा. अर्जाची छापील प्रत स्वत:कडे जतन करून ठेवावी. तसेच सदरची प्रत कोणत्याही परीक्षा केंद्रावर अथवा सेट विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे पाठवू नये.

**परीक्षा शुल्क**

| | |
|---|---|
| १. खुला | रू. ५५०/— (प्रक्रिया शुल्कासह) |
| २. इतर मागासवर्गीय/भटक्या व विमुक्त जाती जमाती/ विशेष मागासवर्गीय (फक्त उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी) (For Non-Creamy Layer) आणि अंध व अपंग प्रवर्ग/अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | रू. ४५०/— (प्रक्रिया शुल्कासह) |

(**टिप**:— उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या आर्थिक मर्यादेसंबंधी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दि. २४ जून २०१३ व दि. १७ ऑगस्ट, २०१३ चा निर्णय संदर्भासाठी पहावा तसेच यासंदर्भात गोवा राज्यातील विद्यार्थ्यांसाठी गोवा शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय बंधनकारक असतील.)

विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा फी फक्त क्रेडीट/डेबीट कार्ड द्वारे भरावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची छापील प्रत त्यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी सेट परीक्षेचे शुल्क क्रेडिट/डेबीट कार्डद्वारे अदा करतील त्यांनी याबाबतचा पुरावा जतन करून ठेवावा.

**सेट परीक्षेचे शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या “http://setexam.unipune.ac.in” या संकेतस्थळावर जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवडयात प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षा शुल्क भरून सुध्दा ज्या विद्यार्थ्यांचे नाव सदर यादीत समाविष्ट नसेल अशा विद्यार्थ्यांनी कार्डद्वारे शुल्क अदा केल्याचा पुरावा set-support@pun.unipune.ac.in या इ—मेल आयडीवर पाठवावा.**

सेट परीक्षेचे माहितीपत्रक व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या “http://setexam.unipune.ac.in” या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/—
(डॉ. नरेंद्र मा. कडू)
कुलसचिव तथा सदस्य सचिव (सेट)